श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित

# महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड. जि. अमरावती.

## वार्षिक अहवाल २०१५-२०१६

सन २०१५-१६ मध्ये वर्गवार प्रवेशित विद्यार्थी संख्या खालीलप्रमाणे.

| अ. क्र | वर्ग | सन २०१५-१६ ची विद्यार्थी संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | कला | वाणिज्य | विज्ञान | एकुण |
| १. | प्रथम वर्ष | ३७८ | ३१४ | २८२ | ९७४ |
| २. | द्वितीय वर्ष | २०१ | २७९ | २१८ | ६९८ |
| ३. | तृतीय वर्ष | १५५ | २२८ | १७९ | ५६२ |
| ४. | एम.ए. भाग-१ (अर्थशास्त्र) | ७३ | | | ७३ |
| ५. | एम.ए. भाग-२ (अर्थशास्त्र) | ३६ | | | ३६ |
| ६. | एम.ए. भाग-१ (इंग्रजी) | १४ | | | १४ |
| ७. | एम.ए. भाग-२ (इंग्रजी) | ९ | | | ९ |
| ८. | एम.ए. भाग-१ (मराठी) | ३० | | | ३० |
| ९. | एम.ए. भाग-२ (मराठी) | १६ | | | १६ |
| १०. | एम.एस्सी. भाग-१ (रसायनशास्त्र) | | | १८ | १८ |
| ११. | एम.एस्सी. भाग-२ (रसायनशास्त्र) | | | २१ | २१ |
| १२. | एम.कॉम. भाग-१ (इंग्रजी माध्य.) | | ३२ | | ३२ |
| १३. | एम.कॉम. भाग-२ (इंग्रजी माध्य.) | | ३१ | | ३१ |
| १४. | एम.ए. भाग-१ (राज्यशास्त्र) | ४१ | | | ४१ |
| १५. | एम.एस्सी. भाग-१ (संगणकशास्त्र) | | | १२ | १२ |
| | **एकुण** | **९५३** | **८८४** | **७३०** | **२५६७** |

**शिष्यवृत्ती व सवलती :-** सन २०१५-१६ मध्ये विद्यार्थ्यांना मिळालेल्या विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती व सवलती धारक विद्यार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | शिष्यवृत्ती / सवलतीचे नांव | सन २०१५-१६ ची विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | भारत सरकार शिष्यवृत्ती | १९९१ |
| २. | अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती | ४७ |
| ३. | विद्यार्थी कल्याण निधी (अमरावती विद्यापीठ) | ०१ |
| ४. | अपंग शिष्यवृत्ती | ०० |
| ५. | गुणवत्ता शिष्यवृत्ती | ०० |
| ६. | फ्रि शीप | २५ |
| ७. | ई.बी.सी. | ३९ |
| ८. | पी.टी.सी./एस.टी.सी. | ०० |
| | एकुण | २१०३ |

**शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी :-** सन २०१५-१६ मध्ये पूर्णकालीन ३२, कंत्राटी पध्दतीचे ११, तासिकेप्रमाणे ११६ , असे एकु ण १५९ शिक्षक व ४३ शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत आहेत.

**ग्रंथालय विभागः-** या महाविद्यालयाचे ग्रंथालय अभ्यासक्र म व इतर ग्रंथांनी समृध्द असून दरवर्षी त्यामध्ये अद्यावत ग्रंथाची भर पडत आहे. व ते समृध्द होत आहे. ग्रंथालयात प्रमुख विषयावरील मासिके नियतकालिके विकत घेण्यात येतात. व प्राध्यापक व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जातात. ग्रंथालयात ३१ मार्च २०१५ रोजी रु.४१,६१,९५७ /- ची एकुण ३२७४८ पुस्तके उपलब्ध होती. त्यानंतर १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६ या सत्रात रु. २,८७,९२१/- ची एकुण ८०६ पुस्तके खरेदी करण्यात आली आहेत. ३१ मार्च २०१६ रोजी रु. ४४,५९,८७८/- किंमतीची एकुण पुस्तके ३३५३४ ग्रंथालयात उपलब्ध आहेत.

Scanned by CamScanner

तसेच ३१ मार्च २०१६ पर्यंत मासिके व नियतकालीकांची संख्या एकुण ४३२ आहे. त्याची किंमत रु. १,४०,४८०/- आहे. व १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६ या सत्रात रु. २०३८५/- किंमतीची एकुण २८ मासिके व नियतकालिके खरेदी करण्यात आली. ३१ मार्च २०१६ ला रु.१,६०,८६५/- किंमतीची एकुण ४२६ मासिके व नियतकालिके उपलब्ध आहेत.

**खेळ व क्रीडा विभाग :-** शैक्षणिक सत्र २०१५-१६ मध्ये शारीरिक शिक्षण विभागाने आंतरमहाविद्यालयीन खेळ व स्पर्धामध्ये खालील प्रमाणे सहभाग नोंदविला.
१. व्हॉलीबॉल २. कबड्डी ३. खो-खो ४. हॅन्डबॉल ५. क्रॉसकन्ट्री ६. मैदानी स्पर्धा ७. कुस्ती ८. वजन उचलणे ९. बॅडमिन्टन १०. बॉक्सींग ११. स्वीमींग १२. क्रिकेट इत्यादी मुला मुलींच्या चमुचा सहभाग होता. विविध चमुच्या खेळातील प्रदर्शन पाहता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची चमु तयार करण्यासाठी महाविद्यालयातील चमुतील विद्यार्थ्यांना सिलेक्शन ट्रायल करिता आमंत्रित केले. वरील खेळांपेकी बॅडमिन्टन मुली, खो-खो मैदानी स्पर्धा बॉक्सींग व बॉल बॅडमिन्टन या खेळामध्ये चमुनी समाधानकारक कामगीरी केली. कु. शुभांगी बाबारावजी कवानपुरे बी.ए.भाग-१ या विद्यार्थीनीने एस.एम.आर. विद्यापीठ, चेन्नई येथे आयोजित आंतरविद्यापीठ बॉल बॅडमिन्टन स्पर्धेमध्ये संगाबा अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केले. करिता तिला विद्यापीठाने कलरकोट देऊन तिचा सन्मानित केले. नईम शेख, बी.एस्सी. भाग-१ या विद्यार्थ्याने सहभाग घेतलेल्या आंतरमहाविद्यालयीन वेट लिप्टींग ८० कि. वजन गटात सुवर्ण पदक प्राप्त केले. कुणाल पी. बेलसरे, बी.कॉम.२ याने आंतरमहाविद्यालयीन बॉक्सींग स्पर्धेत रौप्य पदक प्राप्त केले. प्रणय ग.सुंदरकर, बी.ए.भाग-२ याने मैदानी स्पर्धा २० कि.मी. चालने या स्पर्धेत कास्य पदक प्राप्त केले तसेच कोमलसिंग बघेल याने १५०० मी. व ८०० मी. धावणे मध्ये कास्य पदक प्राप्त केले.

श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती अंतर्गत होणा-या ' शिवाजी ऑलीम्पीयाड ' क्रि डा स्पर्धांमध्ये महाविद्यालयाच्या चमुनी चांगली कामगीरी केली यामध्ये कोमलसिंग बघेल याने १५०० मी. धावने मध्ये सुवर्ण पदक प्राप्त केले. तसेच प्रणय सुंदरकर याने ८०० मी. मध्ये सुवर्ण पदक प्राप्त केले. १००x ४०० व ४ x १०० मीटर रिले रेस या स्पर्धांमध्ये महाविद्यालयाच्या चमुने सुवर्ण पदक प्राप्त केले. आकाश सांडे, बी.ए.भाग-१ याने गोळा फेक स्पर्धेमध्ये कास्य पदक प्राप्त केले. तसेच मुलींच्या चमुने महाविद्यालयास पदक प्राप्त करून दिले. यामध्ये कु. रुपाली वा.राउत, हिने १०० व २०० मी. धावणेमध्ये कास्य पदक प्राप्त केले व पूजा डी. घोरपडे या विद्यार्थीनीने ८०० व १५०० मी. धावणे या स्पर्धेत कास्य पदक प्राप्त केले.

महाविद्यालयाचे शारिरीक शिक्षण संचालक श्री.व्ही.एन.तेलमोरे यांची संगाबा अमरावती विद्यापीठाने क्रॉसकन्ट्री चमू निवड समिती अध्यक्ष म्हणून निवड करुन महाविद्यालयाला मान मिळवून दिला. महाविद्यालयात दि.१ मे ते १५ मे २०१६ या कालावधीत उन्हाळी शिबीर आयोजित करण्यात आले. यामध्ये राज्य व राष्ट्रीय स्तरावर खेळाडू तयार करण्याच्या दृष्टीने पूर्व तयारी प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले. शिबीरामध्ये बॉक्सींग, किक बॉक्सींग, तायकांडो वुशू व कराटे या खेळांचा समावेश करण्यात आला. व आजही १०० ते १५० विद्यार्थी महाविद्यालयाच्या मैदानावर सायं. ६ ते ८.३० पर्यंत सराव करतात. तसेच महाविद्यालयात दिनांक १६ जून ते २१ जून २०१६ ला जागतिक योग दिनानिमित्त योग साधना शिबीराचे आयोजन करण्यात आले. शिबीराची संपूर्ण योग प्रशिक्षकाची जवाबदारी प्राचार्य डॉ.देवानंद अतकरे, यांनी पार पाडली.

**राष्ट्रीय सेवा योजनाः-** महाविद्यालयामध्ये २०० विद्यार्थ्यांचे (१०० मुले/१०० मुली) रा.से.यो. पथक कार्यरत आहे. रा.से.यो.पथकाद्वारे रक्तदान शिबीर, स्वच्छता अभियान, जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. रा.से.यो. पथकाच्या वतीने सन २०१५-१६ मध्ये दि. १३/०९/२०१५ व ३०/१२/२०१५ ला रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात होते. यामध्ये ६९ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. रा.से.यो. पथकाचे वतीने दत्तक ग्राम खडका येथे दि.३०/९/२०१५ ला १०० वृक्षांची लागवड करण्यात आली. रा.से.यो.पथकाच्या वतीने नियमितपणे स्वच्छता अभियान महाविद्यालयाच्या परिसरात व दत्तक ग्राम खडका येथे राबविण्यात येत आहे. रा.से.यो. विभागाच्या वतीने जागतिक योग दिन, जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन, जागतिक एड्स जनजागृती दिन, युवक दिन, संत गाडगेबाबा जयंतीला कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक २८/१०/२०१५ ला 'राष्ट्रोन्नती करिता युवक' या विषयावर कार्यशाळाचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेत प्रा. किशोर फुले, सहयोगी प्राध्यापक, श्री. शिवाजी महाविद्यालय, अमरावती. यांनी मार्गदर्शन केले. दि. ०८/०३/२०१६ ला ' स्पर्धा परीक्षा व मुलाखत तंत्र ' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यशाळेमध्ये प्रा. अमोल पाटील, संचालक, युनिक आय.ए.एस.ॲकेडमी अमरावती यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.व्ही.अतकरे होते.

विद्यापीठाद्वारे आयोजित कार्यशाळेत रा.से.यो. स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. प्रणय सुंदरकर व कु. यशश्री काशीकर यांनी दि.०४/०६/२०१६ ते १४/०६/२०१६ ला राज्यस्तरीय आव्हान शिबीर पुणे विद्यापीठ, पुणे येथे सहभाग घेतला. चेतन सुरजुसे, तुषार राईकवार व अभिजीत वाघ यांनी दि. २७/०१/२०१६ ते ३०/०१/२०१६ ला सहावी विद्यार्थी संसद पुणे येथे सहभाग घेतला. कु. मिनल इंगळे व प्रणय सुंदरकर यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे दि. ११ व १२ जाने. २०१६ ला राष्ट्रीय युवा नेतृत्व विकास कार्यशाळेत भाग घेतला. कु. प्रियंका सोनारे व कु. सरोज शेटे यांनी संगाबा अमरावती विद्यापीठ येथे दि. २४/०१/२०१६ व २५/०१/२०१६ ला आयाजित महिला सक्षमिकरण शिबीरात सहभाग घेतला.

Scanned by CamScanner

रा.से.यो. पथकाच्यावतीने दत्तक ग्राम खडका येथे दि. २९/०१/१६ ते ४/२/२०१६ ला विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले. शिबीरा दरम्यान वनराई बंधारा बांधणे, बौध्दिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

रा.से.यो. पथकाच्यावतीने या सत्रामध्ये १ जुलै रोजी महाविद्यालय परिसरात ५० वृक्षांची लागवड करण्यात आली. व दि.९/८/१५ ला रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ३२ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.ए.के.सोळंके, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. माधुरी उमेकर सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. आर.एस.घाडबुधे व महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. सौ. एस.एन.रत्नपारखी कार्य करीत आहेत.

**राष्ट्रीय छात्र सेना :-** शैक्षणिक सत्र २०१५-१६ मध्ये एन.सी.सी. विभागामध्ये एकुण ५० छात्र प्रवेशित आहेत. ८ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. अमरावती अंतर्गत घेण्यात आलेल्या सर्व प्रशिक्षण शिबीरांमध्ये सर्व छात्र सहभागी झाले होते. २६ जानेवारी २०१५ ला नवी दिल्ली येथे होणाऱ्या प्रजासत्ताक दिन पथसंचलनासाठी कॅडेट वैभव शियाले, ईश्वर गावंडे, आणि शुभम कापसे यांची निवड झाली. नवी दिल्ली येथे झालेल्या स्थलसेना शिबीराकरिता कॅडेट प्रतीक श्रीराव व कॅडेट सुशील पाटील यांची याची निवड झाली. नाशिक येथे होत असलेल्या आर्मी अटॅचमेंट कॅम्प करिता पथकाच्या पाच कॅडेटची निवड झाली आहे. औरंगाबाद येथे संपन्न झालेल्या पूर्व प्रजासत्ताक दिन पथसंचलनासाठी कॅडेट दिपक कोल्हारे याची निवड झाली. पथकातील कॅडेट सचिन राऊत , दिपक कुशवाहा, मनिष केने यांची सेनादलात निवड झाली आहे. पथकातील सर्व कॅडेट्सनी वृक्षारोपण, रक्तदान शिबीर, पल्स पोलिओ शिबीर, स्वच्छता अभियान, मतदार जनजागृती अभियान, रस्ता सुरक्षा सप्ताह इ. मध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

विविध अभियानांमध्ये सहभागी होऊन कॅडेट्स देशसेवा, त्याग व समर्पीत भावनांचा सदैव परिचय देत आहेत.

**सांस्कृतिक कार्यक्रम :-** शैक्षणिक सत्र २०१५-१६ मध्ये सांस्कृतिक समितीच्या माध्यमतून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. तसेच नवीन पीढीस प्रेरणा मिळावी या उदात्त हेतूने महापुरूषांच्या जयंती व पुण्यतिथी तसेच विविध व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने यवतमाळ येथे आयोजित केलेल्या युवा महोत्सवामध्ये महाविद्यालयाच्या सांस्कृतिक चमुने सहभाग घेउन आपल्या महाविद्यालयातर्फे लोकगीत व लोकनृत्याचे उत्कृष्ठ सादरिकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली. डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या ११६ व्या जयंती उत्सवा निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाच्या सांस्कृतिक चमूने लोकगीत व लोकनृत्य तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन व सादरिकरण करण्यात आले. सांस्कृतिक समितीच्या कलावंतांनी स्वागत गीत व इतर समयोचित गीते सादर केली. संस्थेने ठरविलेल्या शिवोत्सव या विभागीय सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. नागपुर व अमरावती जिल्हयातील मोजक्या महाविद्यालयाच्या चमूने यात सहभाग नोंदविला. महाविद्यालयात गणेशोत्सव व शारदोउत्सव दरम्यान विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक तसेच बौध्दिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. तसेच वर्षभर चालणा-या विविध सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थी सहभागी होत असतात.

**विद्यापीठ परिक्षा निकाल:-**

| अ.क्र | वर्ग | सन २०१५-१६ च्या परिक्षेचा निकाल | | |
|---|---|---|---|---|
| | | परिक्षेला बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | निकालाची टक्केवारी |
| १ | प्रथम वर्ष कला | ३४४ | ३७ | १०.७६ |
| २ | द्वितीय वर्ष कला | १९१ | ६४ | ३३.५१ |
| ३ | तृतीय वर्ष कला | १४९ | ८० | ५३.६९ |
| ४ | प्रथम वर्ष वाणिज्य | ३०५ | ११८ | ३८.६९ |
| ५ | द्वितीय वर्ष वाणिज्य | २८१ | १६३ | ५८.०१ |
| ६ | तृतीय वर्ष वाणिज्य | २२८ | १३८ | ६०.५३ |
| ७ | प्रथम वर्ष विज्ञान सेमी. १ | २७९ | ११७ | ४१.९४ |
| ८ | प्रथम वर्ष विज्ञान सेमी. २ | २६९ | १७४ | ६४.६८ |
| ९ | द्वितीय वर्ष विज्ञान सेमी. ३ | २१८ | १०७ | ४९.०८ |
| १० | द्वितीय वर्ष विज्ञान सेमी. ४ | २१३ | ९३ | ४३.६६ |
| ११ | तृतीय वर्ष विज्ञान सेमी. ५ | १७९ | ११२ | ६२.५७ |
| १२ | तृतीय वर्ष विज्ञान सेमी. ६ | १७८ | ११४ | ६४.०४ |
| १३ | एम.ए. भाग-१ अर्थशास्त्र | ६४ | २९ | ४५.३१ |
| १४ | एम.ए. भाग-२ अर्थशास्त्र | ३३ | १८ | ५४.५५ |
| १५ | एम.ए. भाग-१ मराठी | २४ | ०१ | ४.१७ |
| १६ | एम.ए. भाग-२ मराठी | १५ | ५ | ३३.३३ |

Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | एम.ए. भाग-१ इंग्रजी | ११ | १ | ९.०९ |
| १७ | एम.ए. भाग-२ इंग्रजी | ९ | १ | ११.११ |
| १८ | एम.ए. भाग-१ उपयोजित | ३२ | १० | ३१.२५ |
| १९ | एम.कॉम. भाग-१ इंग्रजी सेमी.१ | ३३ | १ | ३०.३३ |
| २० | एम.कॉम. भाग-१ इंग्रजी सेमी.२ | ३१ | ११ | ३५.४८ |
| २१ | एम.कॉम. भाग-२ इंग्रजी सेमी.३ | ३२ | ८ | २५.०० |
| २२ | एम.कॉम. भाग-२ इंग्रजी सेमी.४ | ३६ | २४ | ६६.६६ |
| २३ | एम.एस्सी. रसायनशास्त्र सेमी.१ | २७ | १३ | ४८.१४ |
| २४ | एम.एस्सी. रसायनशास्त्र सेमी.२ | २७ | १७ | ६२.९६ |
| २५ | एम.एस्सी. रसायनशास्त्र सेमी.३ | २१ | १० | ४७.६१ |
| २६ | एम.एस्सी. रसायनशास्त्र सेमी.४ | २० | ११ | ५५.०० |
| २७ | एम.एस्सी. प्राणिशास्त्र सेमी.१ | १२ | ६ | ५०.०० |
| २८ | एम.एस्सी. प्राणिशास्त्र सेमी.२ | ११ | ७ | ६३.६४ |

**मान्यवरांच्या भेटी-** सन २०१५-१६ मध्ये महात्मा फुले व्याख्यानमाला अंतर्गत प्रो.गंगाधर बनबरे, पुणे यांचे व्याख्यान आयोजीत केले. स्व. नानी मायची पं.डी.चौधरी स्मृतीव्याख्यानमाला अंतर्गत डॉ. दिलीप काळे, समाजकार्य महाविद्यालय, अमरावती. यांचे व्याख्यान आयोजीत केले. तसेच स्व. सीतारामजी चौधरी स्मृतीव्याख्यानमाला अंतर्गत डॉ.अशोक. नागापूरे - संगाबा अमरावती विद्यापीठ यांचे व्याख्यान आयोजीत केले. डॉ. भाऊसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख जयंती निमित्त डॉ. प्रमोद कोलते, संगाबा अमरावती विद्यापीठ यांचे व्याख्यान आयोजीत केले. रोजगार व स्वयंरोजगार ॲड. गणेश हलकारे, अमरावती यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळाले. तसेच सचिन कुकडे, यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले. महाविद्यालयातील विविध कार्यक्रमाला मा. ॲड. अरुणभाऊ शेळके, अध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती. , उपाध्यक्ष मा. श्री. महादेवराव भुईभार, मा. डॉ. सुरेश ठाकरे, कोषाध्यक्ष मा. श्री. दि.म.ठाकरे, कार्यकारिणी सदस्य ॲड. एन.के.नाना देशमुख, मा. जगदीशभाऊजी बानखडे, मा. श्री. नरेशचंद्र जी ठाकरे, मा. ॲड. गजानन पुंडकर, सचिव, मा. वि.गो. भांबुरकर, मा. प्रा.श्री. अरुण सगोंडे, स्विकृत सदस्य, मा. सौ. आर.आर.नावलकर, स्विकृत सदस्य, इ. संस्थेचे मान्यवर तसेच स्थानिय व्यवस्थापन समितीचे सदस्य मा.डॉ. सुरेंद्र आडे, मा. श्री. अनिल पाटणकर यांच्या सदिच्छा भेटी व मार्गदर्शन महाविद्यालयास लाभले.

महाविद्यालयात आयोजीत कार्यक्रमाच्या निमित्ताने डॉ. के.एम.तिडके, प्र.कुलगुरु, संगाबा अमरावती विद्यापीठ ,अमरावती. मा. अर्जुन ठोसरे आमदार वरुड. तसेच वरुड शहरातील व परिसरातील मान्यवरांनी भेटी दिल्यात.

महाविद्यालयाचे शैक्षणिक व विकासात्मक उपक्रमात मा. ॲड. अरुणभाऊ शेळके, अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती. व पदाधिकारी श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती. , स्थानिय व्यवस्थापन समितीचे सदस्य व संस्थेचे आजिव सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयीन प्राध्यापक व कर्मचारी यांच्या सहकार्याने पार पडत आहे. यापुढेही यांच्याकडून असेच मार्गदर्शन व सहकार्य मिळत राहील ही अपेक्षा.

(डॉ. डी.व्ही.ठाकरे)

प्राचार्य सचिव

स्थानिय व्यवस्थापन समिती,

महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी

चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड.

Scanned by CamScanner